**ठळक बातम्या**

- विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं उत्तर, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करण्याचं आश्वासन
- छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांचा अवमान केल्याप्रकरणी अटक केलेल्या प्रशांत कोरटकर याला २८ तारखेपर्यंत पोलीस कोठडी
- वित्त विधेयक २०२५ लोकसभेत मंजूर /नवीन आयकर विधेयकावर पावसाळी अधिवेशनात चर्चा होण्याची शक्यता

**आणि**

- राज्याच्या विविध भागात उष्णता वाढत असल्यानं सार्वजनिक आरोग्य विभागाचा नागरिकांना खबरदारीचा इशारा

**<><><><><>**

विधानसभेत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर दिलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांविरोधात अपशब्द वापरणाऱ्या कोरटकर याच्याविरोधात कठोर कारवाई करण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर झालेल्या शवविच्छेदन अहवालात विसंगती आहे, व्हीसेरा आणि बाह्य अहवाल वेगळा आहे, त्यामुळे या प्रकरणासाठी नेमलेल्या समितीनं अहवाल दिल्यावर त्यानुसार कारवाई करू, संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांनाही सोडलं जाणार नाही, असं ते म्हणाले.

राज्यात हुक्का पार्लरचं वाढतं प्रस्थ रोखण्यासाठी यासंदर्भातल्या कायद्यात सुधारणा करण्याची घोषणा त्यांनी केली. हा गुन्हा दखलपात्र केला जाणार असल्याचं ते म्हणाले.

राज्यातील शहरांमधल्या नद्यांच्या पूर पातळीसंदर्भातल्या निळ्या आणि लाल रेषांचं समिती स्थापन करून तातडीनं पुन्हा सर्वेक्षण करण्याचं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिलं. या रेषेत येणाऱ्या जमिनीवर अवैधरित्या विकासकामांची परवानगी दिली असेल तर ती रद्द करून संबंधितांवर कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

मुंबईच्या किनारा नियंत्रण तसंच ना विकास विभागात बेकायदेशीरपणे केलेल्या २६७ बांधकामांविरोधात महापालिकेच्या वतीनं तातडीनं कारवाई करून ती पाडली जातील, अशी घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

**<><><><><>**

विधान परिषदेतही आज अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरू झाली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती अतिशय गंभीर असल्याचा आरोप करत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या चर्चेला सुरुवात केली. सरकारची कारवाईची मानसिकता नसल्यानं गुन्हेगारांना अभय मिळू लागलं आहे, असं ते म्हणाले. बीडमध्ये मस्साजोगच्या सरपंच हत्येतील आरोपी अद्याप पकडला गेलेला नाही, सोमनाथ सुर्यवंशी याचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीत झाल्याचं स्पष्ट होऊनही आरोपींविरोधात सरकारानं कारवाई केलेली नाही, याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

सत्ताधारी पक्षाच्या विरोधात बोललं की कारवाई केली जाते, मात्र महामानवांचा अपमान केल्यावर तत्परतेनं कारवाई होत नाही, अशी टीका त्यांनी केली. अनेक प्रकरणांत बुलडोझर लावून मालमत्तेचं नुकसान केलं जातं. यामुळे राज्याची प्रतिमा मलीन होते असं ते म्हणाले. हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी काहीही चुकीचं वक्तव्य केलेलं नाही, त्यांच्या स्टुडिओची तोडफोड करणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसुल करायला पाहिजे, असं दानवे म्हणाले.

कोकणात रायगडमधल्या रेवसपासून सिंधुदुर्गातल्या रेडी पर्यंतच्या ५२३ किलोमीटरच्या सागरी महामार्गाचं नूतनीकरण करून हा मार्ग चौपदरी ग्रीनफिल्ड मार्ग करणार असल्याचं, मंत्री दादा भुसे यांनी एका तारांकित प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. हे काम येत्या तीन वर्षांत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्यघटनेचं अधिष्ठान लाभल्यामुळे संसदीय लोकशाही अधिक भक्कम झाली आहे, असं प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आज केलं. भारताच्या राज्यघटनेची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल या विषयावर ते सभागृहात बोलत होते. राज्यघटनेच्या आधारे प्रगतीचा पल्ला आपल्याला गाठायचा आहे. स्वातंत्र्य, बंधुता, समता ही मूल्यं लोकशाहीत महत्त्वाची असून आपली लोकशाही जगासाठी प्रेरणादायी ठरतक आहे, असं त्यांनी नमूद केलं. उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनीही या चर्चेदरम्यान आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या,

**होल्ड... बाईट- डॉ. नीलम गोऱ्हे..(३१ सेकंद)**

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान केल्याचा आरोप असलेल्या प्रशांत कोरटकरला कोल्हापूर पोलिसांनी तेलंगणातून अटक केली आहे. कोरटकर याने २४ फेब्रुवारी रोजी इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोनद्वारे धमकी दिली होती. त्या दिवसापासून कोरटकर हा फरार होता. कोरटकरला आज कोल्हापूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. यावेळी पोलिसांनी सात दिवसांची कोठडी देण्याची विनंती केली. मात्र, न्यायालयानं कोरटकर याला २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

**<><><><><>**

राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी कृषी हॅकेथॉनचं आयोजन करणार आहे. अशा प्रकारचं हे देशातलं पहीलंच आयोजन असेल. या ॲग्री हॅकॅथॉनच्या नियोजनाबाबत आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या हॅकेथॉनच्या माध्यमातून जलसंधारणासह सिंचनाच्या नव्या पद्धती, शाश्वतशेतीसाठी आधुनिक उपाययोजना, कीटकनाशक आणि जैविक खतांचा वैज्ञानिक उपयोग, शेतमालाची विक्रीसाखळी सुधारण्याकरता ई-मार्केटिंग अशा महत्वाच्या उपाययोजनांवर भर दिला जाईल. या निमित्तानं युवा संशोधक, स्टार्टअप्स आणि कृषितज्ज्ञांना एकत्र आणून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीनं शेतीसंबंधी समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल असंही अजित पवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभेत आज वित्त विधेयक २०२५ मंजूर झालं. २०२५-२६ वर्षासाठी केंद्र सरकारच्या आर्थिक प्रस्तावांची अंमलबजावणी करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन म्हणाल्या की, हे विधेयक करदात्यांना सन्मानित करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभतेसाठी कर सवलत देणार आहे. नवीन आयकर विधेयकावर पावसाळी अधिवेशनात चर्चा होण्याची शक्यता असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

सीमाशुल्काशी संबंधित विधेयकाचा उद्देश सीमाशुल्क संरचना तर्कसंगत बनवणं आहे. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात कच्च्या मालावरचे शुल्क कमी करून देशांतर्गत उत्पादन आणि निर्यात वाढवण्याचं उद्दिष्ट आहे.

लोकसभेत आज बॉयलर विधेयक २०२४ मंजूरीसाठी सादर करण्यात आलं. बॉयलरचे नियमन, स्टीम बॉयलरच्या स्फोटापासून जीवित आणि मालमत्तेची सुरक्षा सुनिश्चित करण्याची तरतूद या विधेयकात आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी हे विधेयक सभागृहात मांडलं. राज्यसभेनं गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बॉयलर विधेयक २०२४ आधीच मंजूर केलं आहे.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्याचे सुपूत्र हवालदार रामदास साहेबराव बढे आज जम्मू आणि काश्मीरमधील तंगधर जिल्ह्यात कर्तव्य बजावत असताना शहीद झाले. त्यांच्या पार्थीवावर उद्या २६ मार्च २०२५ रोजी लष्करी इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. संगमनेर तालुक्यातल्या मेंढवण या

त्यांच्या मूळ गावी उद्या दुपारी १ वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार होतील. यावेळी लष्करातले जवान आणि अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

हवालदार रामदास बढे हे लष्कराच्या युनिट ३४ अंतर्गत फिल्ड रेजीमेंट मध्ये कार्यरत होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

**<><><><><>**

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत, भारताच्या युकी भांब्री आणि पोर्तुगालच्या नुनो बोर्जेस यांच्या जोडीनं पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

त्यांनी चेकियाच्या ॲडम पावलासेक आणि युनायटेड किंग्डमच्या जेमी मरे या जोडीचा ७-६, ६-२ असा पराभव केला. त्यांचा उपांत्यपूर्व फेरीचा सामना उद्या युनायटेड किंग्डमच्या लॉयड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश यांच्याशी होईल.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथे सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये महाराष्ट्र पदकतालिकेत पाचव्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्राच्या खात्यात एकूण ३६ पदकं असून त्यात १४ सुवर्ण, १३ रौप्य आणि ९ कास्यपदकांचा समावेश आहे. हरयाणा ९५ पदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

**<><><><><>**

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना होणार आहे. अहमदाबाद इथं थोड्याच वेळात संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.
गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

विनाअनुदानित आश्रम शाळेवर शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या धनंजय नागरगोजे या शिक्षकाने अकरा दिवसापूर्वी आत्महत्या केली होती त्यांच्या कुटुंबाला न्याय द्यावा तसंच, नागरगोजे यांच्या पत्नीला सेवेत सामावून घ्यावं या प्रमुख मागणीसाठी आश्रम शाळा शिक्षकांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केलं आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागात उष्णता वाढत असून संभाव्य उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली.

सर्वात जास्त कमाल तापमान अकोला इथं ४० पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस, तर सर्वात कमी किमान तापमान अहिल्यानगर इथं १५ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**